10 OCT 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : डॉ. सुनीलकुमार लवटे नागरी सत्कार समितीतर्फे केशवराव भोसले नाट्यगृहात रविवारी साहित्यिक सुनीलकुमार लवटे यांचा मानपत्र देऊन सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी (डावीकडून) डॉ. दामोदर खडसे, डॉ. सदानंद मोरे, रेखाताई लवटे, डॉ. जी. पी. माळी. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा) बातमी पान ५ वर »

# लवटेंच्या कार्यातून कबीरांची आठवण

## डॉ. दामोदर खडसे; सत्कारप्रसंगी कर्तृत्वाचा आढावा घेणाऱ्या नऊ ग्रंथांचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ९ :** संघर्षमय जीवन वाट्याला येऊनही डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी समाजसेवक, शिक्षक, लेखक, अनुवादक म्हणून यशस्वी कार्य केले. त्यांच्या कार्याची दखल कोल्हापुरातच नव्हे, तर देशभरात सन्मानपूर्वक घेतली जाते. समाजातून त्यांना अवहेलना वाट्याला आली, तरीही ते समाजासाठी सतत काही तरी चांगले देत राहिले. यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व व कार्य संत कबीरांची आठवण करून देते, अशा शब्दांत पंतप्रधानांचे भाषा सल्लागार डॉ. दामोदर खडसे यांनी डॉ. लवटे यांच्या कार्याचा गौरव केला.



कोल्हापूर : डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या नागरी सत्कारप्रसंगी उपस्थित समुदाय. (बी.डी.चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

डॉ. लवटे यांनी ७२ वर्षांच्या संघर्षमय जीवनात सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. याची दखल घेऊन कोल्हापूरकरांतर्फे डॉ. सुनीलकुमार लवटे नागरी सत्कार समितीतर्फे डॉ. लवटे व त्यांच्या पत्नी रेखा यांचा नागरी सत्कार करण्यात आला. या वेळी मानपत्र, सन्मानचिन्ह, महावस्त्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी डॉ. लवटे यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेणाऱ्या नऊ ग्रंथांचे प्रकाशन झाले. या वेळी डॉ. खडसे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. खडसे म्हणाले, की ज्या व्यक्तीची समाजाकडून अवहेलना होते, त्या व्यक्तीत समाजाविषयी द्वेष, विद्रोहाची भावना तयार होते. हा मानसशास्त्रातील सिद्धांत डॉ. लवटे यांनी आपल्या यशस्वी कार्यातून बदलवून दाखविला. समाजसेवक म्हणून वंचितांविषयी त्यांना ममत्व आहे. शिक्षक म्हणून प्रोत्साहनाची ते भूमिका घेतात. अनुवादक म्हणून वि. स. खांडेकरांचे साहित्य देशभर त्यांनी पोचविले. त्यामुळे खांडेकरांचे साहित्य हे आपले साहित्य अशी भावना गुजरात, राजस्थानपासून तमिळनाडूपर्यंत आज पोचली. त्याचे श्रेय डॉ. लवटेंनाच आहे.

सत्काराला उत्तर देताना डॉ. लवटे म्हणाले, की मराठी भाषेतील अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार हिंदीत अनुवादित झाला. तो हिंदी भाषिक राज्यांत रुजू लागला. त्या अनुवादाने मला ओळख दिली. त्याबरोबरच समाजसेवा, शैक्षणिक कार्य, वस्तुसंग्रहालयाचे कार्य हे माझ्या एकट्याचे नसून, ते सामुदायिक आहे. त्या समुदायाचा प्रतिनिधी म्हणून हा सत्कार मी स्वीकारत आहे.

संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे म्हणाले, की डॉ. लवटे हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या कार्य व आचरणात महात्मा गांधी, साने गुरुजी, वि. स. खांडेकर यांच्या मूल्यांचे दर्शन घडते. असा माणूस आपल्या पिढीतील आहे, याचा अभिमान आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. सागर बगाडे यांनी मानपत्र वाचन केले. संदीप मगदूम यांनी सूत्रसंचालन केले.

### ज्ञानपीठ पुरस्कार देण्याची मागणी

सत्कार समितीचे अध्यक्ष डॉ. जी. पी. माळी यांनी प्रास्ताविकात डॉ. लवटे यांच्या शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार द्यावा, अशी मागणी केली.

### माणुसकीच्या भावनेने एकत्र यावे

सध्याच्या राजकीय परस्थितीवर डॉ. लवटे यांनी भाष्य केले. ते म्हणाले, की या देशात मानवेंद्रनाथ रॉय यांचे विचार आचरणात आणले असते तर कॉंग्रेसला आज यात्रा काढण्याची गरज पडली नसती. समाजात लोकशाही, समता, बंधुता, स्वातंत्र्य वाढीस लागावे, अशा प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्यासाठी टोकाच्या जातीभेदापलीकडे जाऊन माणुसकीच्या भावनेने एकत्र येत समाजाला पुढे नेण्याची गरज आहे. ज्या देशात संरक्षणावरील खर्च कमी होतो, सभ्यता व संयम वाढीस लागतो, तोच देश महासत्ता होऊ शकतो.

लोकमत

# एमबीए प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : एमबीए, एमएमएस प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना १३ ऑक्टोबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. त्यानंतर तात्पुरती गुणवत्ता यादी १५ रोजी, तर अंतिम गुणवत्ता यादी १९ ऑक्टोबरला जाहीर करणार आहे.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तीन फेऱ्या होतील. या अभ्यासक्रमाचे वर्ग १० नोव्हेंबरपासून सुरू होतील, अशी माहिती राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) ने दिली.

विनाअनुदानित खासगी शैक्षणिक संस्थांसह इतर संस्थांतील व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या (एमबीए/एमएमएस), तसेच पीजीडीएम अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, सरकारी, अनुदानित, विद्यापीठांतर्गत व्यवस्थापन विभागातदेखील ही प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे.

10 OCT 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आज जिल्हास्तरीय युवा महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास आणि विद्या प्रसारक मंडळ संचलित गडहिंग्लज येथील डॉ. घाळी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १०) ४२ वा कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव होणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होईल.

अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा रत्नमाला घाळी असणार आहेत. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. सतीश घाळी, माजी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांची प्रमुख उपस्थिती असेल. महोत्सवांतर्गत लोककला, नृत्य, लघुनाटिका, मूकनाटिका, नकला, समूहगीत, वक्तृत्व, वादविवाद, एकांकिका, पथनाट्य स्पर्धा होतील. महोत्सवास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यार्थी विकासचे प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांनी केले आहे.

## विदेशी भाषा अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी, फ्रेंच, पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी प्रवेश अर्ज भरण्याची संधी उपलब्ध आहे. बारावी उत्तीर्ण अशी प्रवेश अर्हता आहे. प्रवेशासंबंधी माहिती www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील 'Admission' या लिंकवर उपलब्ध आहे. अधिकच्या माहितीसाठी व प्रवेशासाठी विदेशी भाषा विभाग येथे संपर्क साधावा, असे आवाहन विभागातर्फे करण्यात आले आहे.

पुढारी

# विद्यापीठात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज व रोजगार मध्यवर्ती कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.१४) एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम व विद्यार्थी बैठक आयोजित करण्यात आली आहे. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांतील प्रवेशित दिव्यांग विद्यार्थी, विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन केले आहे.



कोल्हापूर : कोजागरी पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राचे शिवाजी विद्यापीठात टिपलेले छायाचित्र. (छाया : अर्जुन टाकळकर)

तरुण भारत

# विद्यापीठात शुक्रवारी दिव्यांगांसाठी प्रशिक्षण

कोल्हापूर : युजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज् व शिवाजी विद्यापीठातील रोजगार मध्यवर्ती कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ऑक्टोबर रोजी 'एक दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रम व विद्यार्थी बैठक" आयोजित केली आहे. तरी शिवाजी विद्यापीठ व सलंग्नित सर्व महाविद्यालयातील प्रवेशित दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनींनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. अधिक माहिती शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यापीठाच्या लिंकवर विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी.

तरुण भारत

# राष्ट्रीय विकासात बँकांची भूमिका महत्वाची : डॉ. व्ही. पी. कट्टी

**कोल्हापूर :** कमला कॉलेजमधील अर्थशास्त्र विभाग व शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वित्तीय क्षेत्रातील तांत्रिक क्रांती' या विषयावर व्याख्यान झाले. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानात वित्त पुरवठ्याचे महत्व, राष्ट्रीय विकासात ग्रामीण व शहरी बँकांची भूमिका, डिजिटल बँकिंग, ऑनलाईन बँकिंगचे फायदे सांगितले. वित्तीय व्यवहार करताना सावधानता बाळगण्याबाबत मार्गदर्शन केले. ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत प्रा. हेमलता मिणचेकर यांनी, प्रास्ताविक प्रा. नम्रता निकम यांनी, सूत्रसंचालन डॉ. दिनकर कबीर यांनी व आभार प्रा. उदयकुमार इनामदार यांनी मानले. यावेळी सुयेकचे अध्यक्ष डॉ. राहुल म्होपरे, प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. क्रांतिकुमार पाटील, सुयेकचे डॉ. सुभाष कोंबडे, प्रा. उदय आठवले उपस्थित होते.